।। श्री ।।

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

जिथे प्रयत्न संपतात,
तिथे अपयशाची सुरुवात होते.

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ६२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

# अहिल्यानगरच्या ७२ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफी

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी रुपये वर्ग : ना. विखे पाटील । पात्र लाभार्थ्यांना तातडीने खरीप कर्जाचे निर्देश

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही राज्य शासनाची अत्यंत महत्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला असून, कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास प्रारंभ होऊन पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६९७.८१ कोटी रक्कम वर्ग करण्यात आली असल्याची माहिती जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत दूरदृष्य प्रणाली द्वारे झालेल्या कर्ज वितरण शुभारंभास मंत्री विखे यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मंगेश सुरवसे सहभागी झाले होते.

अहिल्यानगर जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी ८१ लाख २५ हजार १३९ रुपये एवढी रक्कम वर्ग करण्यात आली असल्याची माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे.

राज्यातील शेतकरी हा राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. मात्र, अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे काही वेळेस पिकांचे नुकसान होते. त्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. त्यामुळे बाधित शेतकरी शेती कर्जाची मुदतीत परतफेड करू शकत नाही. असे शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे त्यांना बँकाकडून नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती.



त्यानुसार जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी ८१ लाख २५ हजार १३९ रुपयांचा लाभ देण्यात आला. ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करण्यात आली. यात अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ६५ हजार ६५६ शेतकरी सभासदांना ६२२ कोटी ७४ लाख रुपये एवढ्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. तसेच अन्य राष्ट्रीयकृत बँकांमधील सहा हजार ९०३ शेतकरी सभासदांना ७५ कोटी ०७ लाख २५ हजार १३९ रुपये रकमेच्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे.

राज्य शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आर्थिक बळ मिळेल. पहिल्या यादीतील ज्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांचे प्रमाणीकरण पूर्ण होताच त्यांच्या कर्जखात्यांवरही लाभाची रक्कम टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील उर्वरित शेतकऱ्यांनीही आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, या योजनेत जिल्ह्यातील एकूण २ लाख ३३ हजार ७११ शेतकरी खातेदारांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. पहिल्या यादीत १ लाख ३२ हजार ५९१ पात्र शेतकऱ्यांच्या समावेश आहे. त्यापैकी १ लाख १५ हजार ६९२ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेले आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. ८ हजार ३६३ शेतकऱ्यांनी अद्यापही फार्मर आयडी काढलेला नाही अशा शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढावा तसेच जे मयत खातेदार आहेत अशा खात्यांच्या बाबतीत त्यांच्या वारसाने विकास संस्थेकडे, बँकेकडे वारसाची नोंद लावून घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

> राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार हा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता. त्याची वचनपूर्ती होत असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करून आभार मानतो. महायुती सरकार कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे.
>
> **– ना. राधाकृष्ण विखे पाटील**

## SPOT NEWS

### एससी-एसटी आरक्षणात क्रीमी लेयर लागू नाही

**● नवी दिल्ली –** केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून स्पष्ट केले आहे की, अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) च्या आरक्षणात क्रीमी लेयरचे तत्त्व लागू होत नाही. सरकारने या प्रकरणी त्या जनहित याचिकांना विरोध केला आहे, ज्यात एससी-एसटी आरक्षणात क्रीमी लेयर लागू करण्याची आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणासाठी अधिक न्यायसंगत धोरण बनवण्याची मागणी करण्यात आली होती. केंद्राने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, याचिकांमध्ये संविधानांतर्गत मिळालेल्या कोणत्याही मूलभूत अधिकाराच्या उल्लंघनाचा उल्लेख नाही. तसेच, क्रीमी लेयरचा नियम एससी-एसटीवर लागू होतो असे कुठेही नमूद केलेले नाही. सरकारच्या मते, क्रीमी लेयरची संकल्पना केवळ ओबीसी आणि एसईबीसी आरक्षणाशी संबंधित आहे. सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी ११ ऑगस्ट रोजी रमाशंकर प्रजापती आणि इतरांच्या जनहित याचिकांवर केंद्र आणि राज्यांना नोटीस बजावली होती. याचिकेत म्हटले आहे की, एससी-एसटी कुटुंबातील एखाद्या सदस्याने यापूर्वीच घटनात्मक किंवा वरिष्ठ सरकारी पदाचा लाभ घेतला असेल, तर त्याच्या मुलांना आरक्षणाचा लाभ मिळू नये.

### सोशल मीडियावर केंद्र सरकाचा अंकुश

**● नवी दिल्ली –** केंद्र सरकारने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्ससाठी आक्षेपार्ह आणि संवेदनशील मजकूर हटवण्याच्या मुदतीत मोठी कपात केली आहे. यापूर्वी अशा प्रकारच्या मजकुरावर कारवाई करण्यासाठी २४ तासांचा वेळ दिला जात होता, मात्र नव्या नियमांनुसार आता अवघ्या २ तासांच्या आत असा मजकूर प्लॅटफॉर्मवरून हटवणे बंधनकारक करण्यात आले आहे. माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ मध्ये १० फेब्रुवारी २०२६ रोजी सुधारणा करण्यात आल्या असून, त्या अंतर्गत हे नवीन नियम लागू करण्यात आले आहेत. मुख्यत्वे 'डीपफेक' आणि एआयच्या साहाय्याने तयार करण्यात आलेल्या बनावट किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीला डिजिटल विश्वात आळा घालणे, हा यामागील मुख्य उद्देश आहे.

## एफआरपीची चुकीची आकडेवारी देणाऱ्या कारखान्यावर कारवाई करा : स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी

**● पुणे । वीरभूमी –** राज्यातील साखर कारखान्यांनी थकीत एफआरपीची चुकीची आकडेवारी साखर आयुक्त कार्यालयाला सादर कर्णाया, कारखान्यांवर तातडीने कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली आहे.थकीत ऊस बिलासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शेट्टी यांनी राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

राज्यातील कारखान्यांनी सादर केलेली थकीत एफआरपीची आकडेवारी आणि प्रत्यक्ष स्थिती यामध्ये मोठी तफावत आहे असे नमूद करून ये म्हणाले. कारखानदार दिशाभूल करत असून आयुक्त कार्यालयाने याची गंभीर दखल घेऊन संबंधित कारखान्यांवर कारवाई करावी तसेच, राज्य सरकारच्या दोन किंवा तीन टप्प्यातील एफआरपीच्या धोरणामुळे गेल्या तीन वर्षांत ज्या कारखान्यांनी दोन ते तीन टप्प्यांत एफआरपी दिली, त्यांनी विलंबाच्या कालावधीचे व्याज शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने जमा करावे, उसाचे वजन आणि रिकव्हरी (उतारा) हा शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा म्हणून सर्व वजनकाटे तातडीने आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन जोडले जावेत, जेणेकरून काटामारीला आळा बसेल. कारखान्यांमध्ये रिकव्हरी चुकीची करण्याचे प्रमाण वाढले असून ते रोखण्यासाठी साखर आयुक्त कार्यालयाने तिथे स्वतंत्र तपासणी यंत्रणा उभारावी अशी मागणी करण्यात आली.

## पवित्र पोर्टलवरून शिक्षकभरतीला सुरुवात

**● मुंबई । वीरभूमी –** राज्यभरातील जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका, आदिवासी विकास विभाग, शासकीय विद्यालये आणि खासगी शैक्षणिक संस्थांमधील एकूण ३० हजार २०९ शिक्षक व शिक्षणसेवक पदांसाठी पवित्र पोर्टलद्वारे भरती प्रक्रियेला गुरुवारपासून सुरुवात झाली. पात्र उमेदवारांना पदनिहाय पसंतीक्रम भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या भरतीत स्व-प्रमाणपत्र पूर्ण केलेले १ लाख ७० हजार १०८ उमेदवार असल्याने भरतीसाठी चुरस पाहायला मिळणार आहे.

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५'मध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे ही भरती केली जाणार आहे. शासनाच्या धोरणानुसार संबंधित संस्थांमधील रिक्त पदे आणि आरक्षणाचा विचार करून ८० टक्के पदांवर नियुक्ती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या भरतीसाठी यापूर्वी २ लाख २८ हजार ८०८ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २ लाख ११ हजार ३०८ उमेदवार परीक्षेला बसले होते. उमेदवारांना ६ ते ११ ऑगस्ट या कालावधीत पसंतीक्रम भरणे बंधनकारक आहे.

पसंतीक्रम भरण्यासाठी उमेदवारांनी https://tait2025.mahateacherrecruitment. या संकेतस्थळावर लॉगिन करावे. तेथे प्रथम प्राधान्यक्रम त्यानंतर पदनिहाय पसंतीक्रम नोंदवून तो ११ ऑगस्टपूर्वी निश्चित करणे आवश्यक आहे. पसंतीक्रम निश्चित न केल्यास पुढील निवड प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. यासाठी उमेदवारांना एसएमएसद्वारेही सूचना पाठविण्यात येत आहेत. पसंतीक्रम भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मुलाखतीशिवाय भरल्या जाणाऱ्या पदांसाठी गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. भरती प्रक्रियेबाबत काही अडचण अथवा सूचना असल्यास उमेदवारांनी edupavitra25gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# परतीचा मान्सून पारनेरला दमदार बरसणार

## हवामान अभ्यासक पंजाबराव डक । १५ ऑगस्टनंतर पावसाचा जोर वाढणार । सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज

**● पारनेर । वीरभूमी –** यंदाचा परतीचा मान्सून राज्यभर दमदार राहणार असून सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये पारनेर तालुक्यातही चांगला पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तालुक्यातील बंधारे, तलाव आणि जलसाठे भरून निघतील, असा अंदाज प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केला.

येत्या ९ ऑगस्टपर्यंत रिमझिम पावसाची स्थिती राहील. त्यानंतर काही दिवस सूर्यदर्शन होईल; मात्र १५ ऑगस्टनंतर पुन्हा पावसाला सुरुवात होईल. तसेच १ ते ३ नोव्हेंबरदरम्यानही राज्यात पावसाची शक्यता असल्याचे डख यांनी सांगितले.

देशातील हरितक्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या जयंतीनिमित्त पारनेर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या पदव्युत्तर वनस्पतीशास्त्र व हिंदी विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'हवामान अंदाज आणि शाश्वत शेती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी डख बोलत होते. हवामानाचा अंदाज सांगतानाच बदलत्या वातावरणात शेतकऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

ऑगस्टच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांत चांगल्या पावसाला सुरुवात होईल. सप्टेंबरमध्येही पावसाचे प्रमाण समाधानकारक राहील. विशेषतः परतीच्या मान्सूनमध्ये राज्यातील अनेक भागांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. १३ नोव्हेंबरपासून राज्यात थंडीची चाहूल लागेल, असा अंदाजही डख यांनी व्यक्त केला.

हवामानाचा अंदाज केवळ आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारेच नव्हे, तर निसर्गातील घडामोडींवरूनही बांधता येतो, असे डख यांनी सांगितले. पशुपक्ष्यांचे वर्तन, रामफळ, कडुनिंब, जांभूळ यांसारख्या झाडांवरील फळांचे प्रमाण आणि निसर्गातील सूक्ष्म बदलांवरून पावसाची दिशा ओळखता येते. ज्या वर्षी रामफळाला अधिक फळे लागतात, कडुनिंबाला भरपूर निंबोळ्या येतात आणि जांभळाला मोठ्या प्रमाणात फळधारणा होते, त्या वर्षी चांगला पाऊस होतो, असे त्यांनी नमूद केले.



डोंगरमाथा, खडकाळ भाग तसेच नदी व कालव्यांच्या परिसरात गारपिटीचे प्रमाण तुलनेने अधिक असते. मात्र काळ्या जमिनीत गारपीट होत नसल्याचे निरीक्षण डख यांनी नोंदवले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थी, शेतकरी आणि उपस्थितांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर होते. व्यासपीठावर भैरवी उद्योग समूहाचे संचालक दशरथ बोरुडे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रेय घांगुर्डे आणि प्रा. डॉ. विजयकुमार राऊत उपस्थित होते.

यावेळी निवृत्त दुग्धविकास अधिकारी नंदकुमार दरेकर, पाटबंधारे कर्मचारी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष विठ्ठल औटी, शिवाजीराव नरवाडे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. विजयकुमार राऊत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शुभदा आर्डे यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. रविंद्र देशमुख यांनी मानले.

### तापमानवाढीमुळे मुसळधार पाऊस

■ जागतिक तापमानवाढीचा थेट परिणाम पावसाच्या स्वरूपावर होत असल्याचे पंजाबराव डख यांनी सांगितले. ज्या भागात वृक्षसंख्या कमी आहे, त्या भागात कमी वेळेत अधिक व जोरदार पाऊस पडतो. दाट झाडी असलेल्या परिसरात मात्र पावसाचा जोर तुलनेने कमी राहतो. तापमानवाढीमुळे अल्प कालावधीत अतिवृष्टीसारख्या घटना वाढत असल्याने शेतकऱ्यांनी बदलत्या हवामानाचा अभ्यास करून शेतीचे नियोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# SPOT NEWS

## स्वातंत्र्यदिनानिमित्त अहिल्यानगरात भव्य सांस्कृतिक महोत्सव

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जय असोसिएशन ऑफ एनजीओ (महाराष्ट्र राज्य) संलग्न उडाण फाउंडेशनच्या वतीने भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त भव्य सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर गीत स्पर्धा, नृत्य स्पर्धा तसेच 'महाराष्ट्राची लोकधारा' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १५ ऑगस्ट रोजी शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड, अहिल्यानगर येथे हा सोहळा उत्साहात पार पडणार असून, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा राज्यस्तरीय 'उडाण पुरस्कार' देऊन गौरव करण्यात येणार आहे. महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राही फाउंडेशनच्या संचालिका रूपाली करांडे यांना राज्यस्तरीय उडाण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. स्वयंरोजगाराच्या माध्यमातून ७५० महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले असून, त्यांच्या या सामाजिक योगदानाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. औद्योगिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे सागर ससाणे हे स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड येथे गेली २० वर्षे कार्यरत असून, ते उच्चविद्याविभूषित आहेत. औद्योगिक सुरक्षा, गुणवत्ता व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन, संशोधन उपक्रम, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, व्याख्याने तसेच कौशल्य विकासाच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या भरीव योगदानाबद्दल त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या सेंट सेव्हिअर्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य ज्योत्स्ना शिंदे यांनाही राज्यस्तरीय उडाण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांना मदत, रक्तदान शिबिरे, अनाथ व विधवा महिलांना सहाय्य, सामाजिक संस्थांना सहकार्य, विद्यालयाचे नूतनीकरण, मतदार जागृती अभियान अशा विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांमुळे त्यांची विशेष दखल घेण्यात आली आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावरील आक्षेपार्ह वक्तव्याचा शिवसेनेचा निषेध

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांच्याविषयी करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा शिवसेना महिला आघाडीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. शिवसेना महिला आघाडीच्या नेत्या स्वाती जाधव यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात महिलांचा सन्मान हा राजकारणाचा विषय नसून तो आपल्या संस्कारांचा आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असल्याचे स्पष्ट केले. ॲड. स्वाती जाधव म्हणाल्या की, कोणत्याही पक्षाच्या महिला नेत्या असोत किंवा समाजातील कोणतीही महिला, त्यांच्याविषयी अपमानास्पद किंवा अवमानकारक भाषा वापरणे हे अत्यंत निषेधार्ह आहे. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याबाबत करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा शिवसेना महिला आघाडी जाहीर आणि तीव्र निषेध करते. महिलांचा अपमान हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अपमान असून, अशा प्रकारच्या वक्तव्यांना कोणत्याही परिस्थितीत समर्थन दिले जाणार नाही. महिलांचा स्वाभिमान, सुरक्षितता आणि सन्मान जपण्यासाठी शिवसेना महिला आघाडी कायम ठामपणे उभी राहील, असेही त्यांनी नमूद केले. यापुढे कोणत्याही महिला नेत्या किंवा सर्वसामान्य महिलांविषयी अवमानकारक वक्तव्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणीही ॲड. स्वाती जाधव यांनी केली. त्यांनी सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि नागरिकांना महिलांविषयी आदराची भूमिका कायम ठेवण्याचे आवाहन केले.

# चास येथील दादा स्वामी मंदिरात सापडले दोन शिलालेख

## इ.स. १६९० मध्ये बाबाजी पाटील कारले यांनी श्री नरसिंह देवाचे देऊळ बांधल्याची नोंद

■ **विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर तालुक्यातील चास-अकोळनेर रस्त्यालगत असलेल्या दादा स्वामी समाधी मंदिरात अठराव्या शतकातील दोन महत्त्वपूर्ण शिलालेख आढळून आले आहेत. यापैकी एक शिलालेख मंदिराच्या सभामंडपाच्या समोरील भिंतीवर असून, दुसरे दोन उठाव स्वरूपातील लेख मंदिराच्या गाभाऱ्यातील समाध्यांसमोर आहेत. मुख्य शिलालेख चार ओळींचा असून तो देवनागरी लिपीत मराठी भाषेत कोरलेला आहे. लेखाच्या काही भागाची झीज झाली असून, रंग व फरशीमुळे काही अक्षरे अस्पष्ट झाली आहेत. मात्र छाप घेतल्यानंतर लेखाचा मजकूर स्पष्टपणे वाचता येतो.

**शिलालेखाचे वाचन :**

**१. श्री नरसिह देव शके १६१२**
**२. सुभानु नाव सवछरे श्राव**
**३. ण सुध १ देऊळ केले तानाजी**
**४. सुत बाबाजी पा. मो. कारले.**

या लेखानुसार शके १६१२, सुभानू नाम संवत्सर, श्रावण शुद्ध प्रतिपदा,





■ अखिल भारतीय संत समितीचे जिल्हाध्यक्ष तथा श्री संत दादा स्वामी (नरहर सिद्ध) यांचे १३ वे वंशज प्रसाद महाराज देव यांनी शिलालेखावरील दिनांक स्पष्ट केल्या. तसेच त्यांनी या संदर्भात लिहिलेल्या पुस्तकातही याबाबत स्पष्ट उल्लेख आढळतो.

म्हणजेच १६९०, तानाजी पाटील यांचे पुत्र मुकादम बाबाजी पाटील कारले यांनी श्री नरसिंह देवाचे देऊळ बांधल्याची नोंद आहे.

मंदिराच्या गाभाऱ्यातील दोन समाध्यांवरील उठाव स्वरूपातील लेखांमध्ये–

**१. ॥ हरी दादाजी देव ॥**
**२. ॥ श्री दादाजी देव ॥**

असे उल्लेख आढळतात. या समाध्या मंदिराशी संबंधित पूजनीय धार्मिक व्यक्ती, संत किंवा महंतांच्या असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

या शिलालेखामुळे चास परिसरातील अठराव्या शतकातील नरसिंह उपासना, स्थानिक देवस्थानांची परंपरा, ग्रामव्यवस्था आणि धार्मिक-सामाजिक जीवनावर महत्त्वपूर्ण प्रकाश पडतो. देवनागरी लिपी, तत्कालीन मराठी भाषेचा वापर आणि शक-संवत्सर पद्धतीचा उल्लेख यामुळे हा लेख इतिहास, लिपीशास्त्र आणि भाषावैज्ञानिक अभ्यासाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा ठरतो.

या शिलालेखाचे, संशोधन, वाचन व माहिती संकलन पुणे येथील शिलालेखतज्ज्ञ अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.

## आ. आशुतोष काळेंच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप



■ छाया । जनार्दन जगताप

**● कोपरगाव । वीरभूमी–**

मतदारसंघाचे आमदार आशुतोष काळे यांचा वाढदिवस यावर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून सामाजिक बांधिलकी जपत विविध शैक्षणिक उपक्रमांनी साध्या व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त सडे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना काळे गटाच्या कार्यकर्त्यांच्या वतीने स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना स्कूल बॅगमिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव दिसून आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करण्याबरोबरच चांगले संस्कार आणि शिस्त जोपासण्याचे आवाहन केले.याप्रसंगी बोलतांना उपस्थितांनी सांगितले की, आमदार आशुतोष काळे यांनी कोपरगाव मतदार संघातील गावांमध्ये रस्ते, पूल व इतर विकासकामांमुळे विद्यार्थ्यांचा शाळेपर्यंतचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ झाला असून ग्रामीण शिक्षणाला चालना मिळत आहे. त्यामुळे त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले.

यावेळी सडे गावचे सरपंच सतीश बारहाते, ग्रामसेवक चंद्रकांत जोशी, गणेश बारहाते, संदीप बारहाते, रमेश वाकचोरे, अमोल कोताडे, विजय बारहाते, संतोष बारहाते, अनिल बारहाते, माणिक बारहाते, सुरज बारहाते, वृषाल बारहाते, रुपेश बारहाते, अतुल बारहाते, घनशाम बारहाते, तुकाराम बारहाते, जगनाथ बारहाते, पंडित गुंजाळ, सागर बारहाते व शाळेचे शिक्षक वृंद उपस्थित होते.

## निघोज बाजारपेठेत कचरा-गटारींचा प्रश्न ऐरणीवर

**● निघोज । वीरभूमी–**



■ छाया । दत्ता उनवणे

निघोज आणि परिसरात अस्वच्छतेचे प्रमाण वाढल्याने व्यावसायिक व ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. कचरा, तुंबलेल्या गटारी आणि दुर्गंधीचा सर्वाधिक फटका बाजारपेठेतील व्यावसायिकांना बसत असून, या समस्येचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी व्यापारी असोसिएशन व ग्रामस्थांनी केली आहे. यासाठी पदाधिकारी लहूशेठ गागरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

याबाबतचे निवेदन माजी सरपंच व प्रशासक चित्राताई वराळ पाटील आणि ग्रामसेवक संजय पवार यांना देण्यात आले.

निघोजच्या नवी पेठेतील एसटी बसस्थानक ते स्मशानभूमी परिसरातील व्यावसायिकांना अस्वच्छतेचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणावर दुकाने असून, स्मशानभूमीसमोर कचरा डेपो असतानाही काही नागरिक तसेच ग्रामपंचायत कर्मचारी कचरा डेपोत लांबवर कचरा न टाकता जवळच कचरा फेकत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

वाऱ्यामुळे तसेच मोकाट कुत्र्यांमुळे हा कचरा पुन्हा व्यावसायिकांच्या अंगणात व दुकानांमध्ये येतो. त्यामुळे सकाळी दुकाने सुरू करण्यापूर्वी साफसफाई करण्यात व्यावसायिकांचा बराच वेळ जात असून, त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

परिसरातील गटारी कायमस्वरूपी तुंबलेल्या असून, ग्रामपंचायतीकडे साफसफाईसाठी कर्मचारी असतानाही या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तुंबलेल्या गटारींमुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून, साथीचे आजार उद्भवण्याची भीती आहे. याचा त्रास दुकानदार तसेच ग्रामस्थांना सातत्याने सहन करावा लागत आहे.

सरपंच व ग्रामसेवकांनी आठवड्यातून किमान दोन वेळा बाजारपेठेत पाहणी करून परिसरातील स्वच्छतेची स्थिती तपासावी, अशी मागणी करण्यात आली आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या गावात योग्य नियोजनाअभावी नागरिकांना अस्वच्छतेचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे निवेदनाची तातडीने दखल घेऊन स्वच्छतेच्या उपाययोजना कराव्यात, असे आवाहन व्यापारी असोसिएशन व ग्रामस्थांनी केले आहे.

यावेळी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष बबनराव तनपुरे, लहूशेठ गागरे, संदीप वराळ, संदीप लामखडे, माऊली रसाळ, मंगेश काळे, संदीप घोलप, सोपान राऊत, सौरभ वरखडे, नितीन लोढा, सोपान लंके, अफजल मोमीन, भिका वरखडे, सामाजिक कार्यकर्ते रवि रणसिंग आदी उपस्थित होते. ग्रामपंचायतीला दिलेल्या निवेदनावर व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी व ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

# ध्वनीप्रदूषण करणाऱ्यांची आता खैर नाही!

## डीजे, कर्णकर्कश बँड, फटाके अन् मॉडिफाइड बुलेटवर श्रीगोंदा पोलिसांची करडी नजर । व्यापाऱ्यांकडून पोलिसांना सीसीटीव्ही कॅमेरा

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

शहरातील वाढत्या ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी श्रीगोंदा पोलिसांनी आता कडक पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. डीजे, कर्णकर्कश बँड, रात्रीच्या वेळी मोठ्या आवाजाचे फटाके तसेच सायलेन्सरमध्ये बदल करून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेटस्वारांवर कारवाई करण्यात येणार आहे. याबाबत पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगोंदा पोलीस ठाण्यात व्यापारी असोसिएशनची विशेष बैठक घेण्यात आली.

शहरातील ध्वनीप्रदूषणामुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले तसेच आजारी व्यक्तींना होणाऱ्या त्रासाबाबत व्यापाऱ्यांनी बैठकीत चिंता व्यक्त केली. ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशा विविध सूचना व्यापाऱ्यांनी मांडल्या.

सार्वजनिक कार्यक्रम आणि मिरवणुकांमध्ये नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डीजे वाजविणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. ध्वनीची मर्यादा ओलांडून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बँड चालकांवरही गुन्हे दाखल करण्याचा इशारा पोलिसांनी दिला. तसेच रात्रीच्या वेळी मोठ्या आवाजाचे फटाके फोडून नागरिकांच्या शांततेचा भंग करणाऱ्यांवरही पोलिसांची नजर राहणार आहे. ध्वनीप्रदूषणासंदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

शाळा, महाविद्यालय परिसर आणि मुख्य बाजारपेठेत सायलेन्सरमध्ये बदल करून बुलेटचा कर्णकर्कश आवाज करणाऱ्या वाहनचालकांवर विशेष कारवाई केली जाणार आहे. नियमबाह्य सायलेन्सर आढळल्यास ते जप्त करून संबंधितांवर दंडात्मक तसेच आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

बैठकीत व्यापारी असोसिएशनने पोलिसांच्या कामाला हातभार लावण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. शहरातील सुरक्षितता वाढविण्यासाठी व्यापाऱ्यांच्या वतीने पोलिसांना एक सीसीटीव्ही कॅमेरा देण्यात येणार आहे. व्यापारी आणि पोलिसांमध्ये वाढत असलेला समन्वय शहराच्या सुरक्षिततेसाठी उपयुक्त ठरणार आहे.



■ छाया । विजय उंडे

ध्वनीप्रदूषण रोखणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. सण-उत्सव आणि सार्वजनिक कार्यक्रम आनंदात साजरे करताना इतरांच्या शांततेचा व आरोग्याचा विचार करणे गरजेचे आहे. नागरिकांनी ध्वनीप्रदूषणासंदर्भातील नियमांचे पालन करून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी केले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## जागतिक आदिवासी दिनानिमित्त रविवारी सावेडीत सांस्कृतिक जल्लोष

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी सेवा प्रतिष्ठान, अहिल्यानगरच्या वतीने रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सावेडी उपनगरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भव्य रॅली आणि आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आदिवासी समाजाची परंपरा, सांस्कृतिक वारसा, निसर्गाशी असलेले अतूट नाते आणि समाजाच्या हक्कांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उत्सव उत्साहात साजरा केला जाणार असून, समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. संयुक्त राष्ट्र संघाने आदिवासी समाजाचे निसर्गसंवर्धनातील योगदान, त्यांची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि जागतिक स्तरावरील महत्त्व लक्षात घेऊन ९ ऑगस्ट हा दिवस 'जागतिक आदिवासी दिन' म्हणून घोषित केला आहे. त्यानिमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही आदिवासी सेवा प्रतिष्ठानच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आयोजकांनी सांगितले की, आदिवासी समाज हा निसर्गपूजक असून जंगल, जल, जमीन आणि पर्यावरणाशी त्याचे अतूट नाते आहे. पृथ्वीचे संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी आदिवासी संस्कृतीचे जतन व संवर्धन अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे यंदाच्या उत्सवामध्ये आदिवासी संस्कृती, परंपरा, लोककला, इतिहास, स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी क्रांतिकारकांचे योगदान, तसेच आदिवासी समाजाचे हक्क, अधिकार आणि विविध प्रश्न यांवर विशेष भर दिला जाणार आहे. रविवारी सकाळी प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून भव्य सांस्कृतिक मिरवणुकीला प्रारंभ होईल. ही मिरवणूक प्रोफेसर कॉलनी चौक, भिस्तबाग चौक, भिस्तबाग महाल मार्गे श्रेयस लॉनपर्यंत काढण्यात येणार आहे. मिरवणुकीचा समारोप भिस्तबाग महाल शेजारील श्रेयस लॉन येथे होईल. त्यानंतर सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, लोककला सादरीकरण, व्याख्याने आणि समाजप्रबोधनपर उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

## नेप्ती विद्यालयात गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेशाचे वाटप

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री स्वामी आण्णा हजारे शिक्षण संस्थेच्या नेप्ती विद्यालयात माजी विद्यार्थी तथा सामाजिक कार्यकर्ते मनोज चिंतामण पवार यांनी पुढाकार घेतला. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या, पेन, दप्तर यांसह विविध शैक्षणिक साहित्य तसेच शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. स्वतः ज्या विद्यालयात शिक्षण घेतले, त्याच विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न मनोज पवार यांनी केला. शैक्षणिक साहित्य आणि गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणातील आवश्यक साहित्यापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. यावेळी संस्था संचालक दिलीप होळकर, केडगावचे केंद्रप्रमुख भगवान बोरुडे, सामाजिक कार्यकर्ते मनोज पवार, रामदास फुले, अमोल चौगुले, महेश पवार, पोलीस पाटील अरुण होले, गोरख जपकर, अजित कोतकर, नानासाहेब होळकर, मुख्याध्यापक बाबा भोर, नानासाहेब घोडके, संतोष खरमाळे, गोरक्ष कोतकर, बाबूलाल सय्यद, सविता कोरडे, श्रद्धा भांड, अश्विनी पवार, शिवाजी जाधव यांच्यासह शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांची विनंती बदली...

# पण 'टोळधाड' टोळीला फुटल्या उकळ्या...!!

### श्री. ठेंगे यांच्या बदलीमुळे सर्वसामान्य जनता हिरमुसली । बदली रद्द करण्यासाठी अनेकांकडून विनंती

**■ विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे पाच वर्षापासून अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यरत आहेत. कौटुंबिक अडचणींमुळे सोयीस्कररीत्या पुणे येथे बदली होण्यासाठी त्यांनी एप्रिल महिन्यात पोलिस प्रशासनाकडे विनंती अर्ज केला होता. त्यांची बदली मे महिन्यात होणे अपेक्षित असताना दिरंगाईमुळे ती ऑगस्ट महिन्यात झाली. ही प्रक्रिया सर्वसाधारण असतानाही श्रीगोंदा येथे दोन महिन्यात बदली होऊन आलेल्या पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी गुन्हेगारांवर जरब बसविली. तालुक्यात सामाजिक अशांतता पसरवणाऱ्या 'टोळधाड' टोळीच्या मुसक्या आवळण्याचा प्रयत्न केला. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांची बदली त्यांच्या विनंती अर्जाने झाली असली तरी 'टोळधाड' गँग आनंदोत्सव साजरा करण्याच्या तयारीत आहेत मात्र त्यांचा हिरमोड होण्याची शक्यता बळावली आहे.

पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी बेलवंडी पोलिस ठाण्यात रुजू असताना 'ऑपरेशन मुस्कान' राबवून राज्यभर नावलौकिक मिळवला. बेलवंडी येथील त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन तत्कालीन पोलिस अधीक्षक यांनी त्यांची बदली राहुरी पोलीस ठाणे येथे केली. राहुरीमध्ये कार्यरत असताना त्यांनी गुन्हेगारीला चाप लावला. सर्वसामान्यांचा आश्वासक चेहरा म्हणून श्री. ठेंगे यांनी त्यांची कारकिर्द गाजवली. शासनाच्या धोरणानुसार श्री. ठेंगे यांची बदली राहुरीवरून श्रीगोंदा येथे करण्यात आली. राहुरी येथे त्यांचा अभूतपूर्व असा निरोप समारंभ जिल्हाभरातील पोलिस वर्तुळात गाजला.



पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मुलांच्या शैक्षणिक अडचणी, कौटुंबिक अडचणी यामुळे त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातून पुणे येथे बदली होण्यासाठी पोलिस प्रशासनाकडे सहा महिन्यापासून प्रयत्न चालवले होते. दोन महिन्यांपूर्वी श्रीगोंद्यात आल्यानंतर जुन्या प्रकरणांचा निपटारा केला होता. गुन्हेगारांना जरब बसवली. श्रीगोंदा शहरासह तालुक्यात 'टोळधाड' टोळी सामाजिक अशांतता गेल्या दहा वर्षांपासून पसरवत आहे. त्या टोळीला लगाम घालण्याचा प्रयत्न त्यांनी चालू केला मात्र त्यांच्या विनंती अर्जाची दखल घेऊन पोलिस प्रशासनाने त्यांची बदली त्यांच्या सोयीनुसार पुणे येथे केली.

निरीक्षक संजय ठेंगे यांच्या बदलीची वार्ता पसरताच 'टोळधाड' टोळीने व गुन्हेगारी जगतातील अनेकांनी श्री. ठेंगे यांच्या विरोधात सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल केल्या. अनेकांनी अश्लाघ्य भाषेचा वापर करत सोशल मीडियावर पोस्ट केल्या. श्रीगोंद्यातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या वागण्याची गांभीर्याने दखल पोलिस प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतली. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांची श्रीगोंदा पोलीस ठाण्यात काही महिन्यांसाठी आवश्यकता आहे याची जाणीव वरिष्ठांना किंबहुना या प्रकरणामुळे झाली. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी काही कालावधी पुरते श्रीगोंद्यात रहावे यासाठी त्यांच्यावर वरिष्ठांचा दबाव वाढत चालला आहे.

### पो.नि. संजय ठेंगे यांच्या बदलीला स्थगिती?

■ पो.नि. संजय ठेंगे यांनी दोनच महिन्यात श्रीगोंदा पोलिस ठाण्यात आपल्या कार्यकर्तृत्वाची झलक दाखवली. सर्वसामान्याला न्याय व गुन्हेगारी प्रवृत्तीला शिक्षा या द्विसूत्री कार्यक्रमातून गुन्हेगारी विश्वावर वचक बसवला. त्यामुळे अल्पावधीतच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे श्रीगोंदा तालुक्यात लोकप्रिय अधिकारी बनले. तालुक्यातील अनेक अधिकारी त्यांच्याकडे ब्लॅकमेलर 'टोळधाड' टोळीच्या तक्रारी करू लागले. मात्र अचानक त्यांची बदली झाल्याने तालुक्यातील अनेक नागरिकांनी श्री. ठेंगे यांची बदली रद्द होण्यासाठी राजकीय पक्षातील नेत्यांकडे दबाव वाढवला. पोलिस प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोनाफोनी केली. श्रीगोंद्यात काही कालावधीसाठी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी तसेच गुन्हेगारांना चाप बसवण्यासाठी श्री. ठेंगे यांची आवश्यकता आहे. यासाठी काही महिन्यांच्या कालावधीसाठी त्यांची बदली स्थगित केल्याचे समजते.

## फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूलचे वर्चस्व

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत शुक्रवारी (दि. ७ ऑगस्ट) अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर फुटबॉलचे रंगतदार सामने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. दिवसभर झालेल्या सामन्यांमध्ये प्रवरा पब्लिक स्कूलने अनेक गटांत दमदार कामगिरी करत एकहाती वर्चस्व गाजवले, तर आर्मी पब्लिक स्कूलनेही प्रभावी खेळाच्या जोरावर महत्त्वपूर्ण विजय मिळवले. अनेक सामन्यांमध्ये खेळाडूंनी हॅट्ट्रिकची नोंद करत प्रेक्षकांचे लक्ष वेधले.

सकाळच्या सत्रात १६ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि आयकॉन पब्लिक स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने २–० गोलने विजय मिळवला. आर्मी पब्लिक स्कूलकडून सिद्धी पोटे हिने ३३ व्या मिनिटाला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर भावना हिने आणखी एक गोल करत संघाचा विजय निश्चित केला.

यानंतर प्रवरा पब्लिक स्कूल आणि आठरे पाटील स्कूल यांच्यातील १६ वर्षांखालील मुलींचा सामना चुरशीचा झाला. प्रवरा पब्लिक स्कूलच्या दामिनी जाधव हिने २१ व्या मिनिटाला गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर संघाने उत्कृष्ट बचावात्मक खेळ करत आठरे पाटील स्कूलला एकही गोल करण्याची संधी दिली नाही आणि प्रवरा पब्लिक स्कूलने १–० गोलने विजय मिळवला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूलने ऊर्जा गुरुकुलवर ७–० गोलने दणदणीत विजय मिळवला.

## अकोलेतील कोल्हार-घोटी मार्गावर अपघातप्रवण ठिकाणी संरक्षक कठडे उभारण्याची ग्राहक पंचायतची मागणी

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले शहरातील कोल्हार–घोटी मार्गावर सेंट्रल बँक व शॅम्प्रो कार्यालयासमोरील अपघातप्रवण ठिकाणी सीडी वर्क, संरक्षक कठडे, दिशादर्शक फलक, झेब्रा क्रॉसिंग तसेच आवश्यक सूचना फलक तातडीने बसवावेत, अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

याबाबतचे निवेदन तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंत्यांना देण्यात आले. ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, माधवराव तिटमे आणि दत्तात्रय ताजणे यांनी ही माहिती दिली.

निवेदनात म्हटले आहे की, कोल्हार–घोटी मार्गावरील सेंट्रल बँक व शॅम्प्रो कार्यालयासमोरील रस्त्यावर आजपर्यंत अनेक अपघात झाले आहेत. अकोले नगरपंचायत हद्दीत या मार्गावर मोटारसायकल, जीप, ट्रक तसेच अवजड वाहनांची मोठी वर्दळ असते. महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि शालेय विद्यार्थ्यांचीही या मार्गावर सतत ये–जा सुरू असते.

या अपघातप्रवण ठिकाणी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत ग्राहक पंचायत अकोलेसह विविध संघटना आणि नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी व तोंडी स्वरूपात अनेकदा सूचना व तक्रारी केल्या आहेत. मात्र त्याची अद्याप प्रभावी दखल घेतली नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

'आणखी किती अपघात झाल्यानंतर किंवा एखाद्याचा जीव गेल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार आहे?' असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने रस्ते अपघातांच्या संदर्भात दिलेल्या आदेश व सूचनांचे पालन करून नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागण्यांवर त्वरित कार्यवाही न झाल्यास आंदोलन आणि रास्ता रोको करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला असून, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असे नमूद करण्यात आले आहे.

निवेदनावर ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, अध्यक्ष दत्ता शेनकर, सचिव राम रुद्रे, कार्याध्यक्ष महेश नवले, प्रा. डॉ. सुनील शिंदे, माधवराव तिटमे, बबनराव तिकांडे, दत्तात्रय ताजणे, सुनील देशमुख, साहेबराव दातखिळे, ज्ञानेश्वर पुंडे, बादशहा ताजणे, रामदास पांडे, भाऊसाहेब वाकचौरे आदींच्या सह्या आहेत.

# पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या 'चूजिंग गोल्ड' या आत्मचरित्राचे प्रकाशन

### १९४ वर्षांच्या वारशाला नवी दिशा देणाऱ्या सहाव्या पिढीतील उद्योजकाचा प्रेरणादायी प्रवास

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित सराफी व्यावसायिक घराण्यांपैकी एक असलेल्या 'पीएनजी ज्वेलर्स'चा वारसा वयाच्या मध्यतिशीत स्वीकारलेल्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांनी आपल्या आयुष्यातील अनुभव, संघर्ष, निर्णय आणि नेतृत्वाचा प्रवास शब्दबद्ध केला आहे. त्यांचे आत्मचरित्र 'चूजिंग गोल्ड' हे पेंग्विन रँडम हाऊस इंडिया यांनी राष्ट्रीय स्तरावर प्रकाशित केले आहे.

'चूजिंग गोल्ड' हे अत्यंत प्रामाणिक आणि वैयक्तिक अनुभवांवर आधारित असे पुस्तक आहे. भारतातील सर्वात जुन्या व्यावसायिक वारशांपैकी एकाचा वारसा तरुण वयात स्वीकारल्यानंतर, आज वयाच्या एकोणपन्नाशीत डॉ. सौरभ गाडगीळ यांनी आपल्या आयुष्याच्या प्रवासाकडे मागे वळून पाहत त्यातील अनुभव, संघर्ष, निर्णय आणि शिकवणी यांचा प्रांजळ वेध घेतला आहे. हा प्रवास बाहेरच्या जगाला दिसणाऱ्या यशाचा नसून, त्यांनी प्रत्यक्ष अनुभवलेल्या वास्तवाचा आणि त्यातून घडलेल्या व्यक्तिमत्त्वाचा आहे.

या आत्मचरित्रात डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या आयुष्याला आकार देणारे अनेक महत्त्वाचे क्षण, आजोबा आणि आई यांच्यासोबतचे आयुष्यभर स्मरणात राहिलेले संवाद, काळाच्या ओघात उमगलेल्या गोष्टी तसेच त्यांच्या विश्वास, धैर्य आणि मूल्यांची कसोटी पाहणारे अनेक कठीण निर्णय यांचा प्रामाणिक वेध घेण्यात आला आहे. १९४ वर्षांच्या पीएनजी ज्वेलर्सच्या समृद्ध वारशाची पार्श्वभूमी या कथेला लाभली असली, तरी या पुस्तकाचा केंद्रबिंदू हा स्वतः डॉ. गाडगीळ यांचा व्यक्तिमत्त्व विकास, त्यांचा संघर्ष, त्यांनी घेतलेले निर्णय आणि परंपरेचा सन्मान राखत स्वतःचा स्वतंत्र मार्ग घडवण्याचा प्रेरणादायी प्रवास हा आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, आयुष्य जगताना स्वतःसाठी जो वेळ मिळतो, ज्यात आपण मागे वळून पाहतो, तशी संधी मला कधी मिळाली नाही. या पुस्तकाच्या निमित्तानं पहिल्यांदाच ही संधी मिळाली. स्वतःशी संवाद साधत अनेक प्रश्नांना या निमित्तानं मला सामोरं जाता आलं. आजपर्यंत मी घेतलेल्या कोणत्या निर्णयांचा मला खऱ्या अर्थानं अभिमान आहे? कोणत्या निर्णयाबाबत आजही मनात सल आहे, कोणते निर्णय अनुभवाच्या जोरावर योग्य ठरले आणि कोणते केवळ नशिबाच्या साथीनं योग्य ठरले. या सगळ्या मला पडलेल्या प्रश्नांना मी दिलेलं प्रामाणिक उत्तर म्हणजे 'चूजिंग गोल्ड' हे पुस्तक. त्यात कोणताही आडपडदा नाही किंवा यशानंतर निर्माण होणाऱ्या परिपूर्णतेचा कोणता आवही नाही.

हे पुस्तक लिहिताना मला सर्वाधिक आश्चर्य वाटले ते म्हणजे माझ्या आयुष्याला आकार देणारे अनेक क्षण किती साधे आणि शांत होते. आजोबांसोबत झालेला एक संवाद, स्वतःपासूनही लपवून ठेवलेले एक अपयश किंवा पंचविशीत दुर्लक्षित केलेला एखादा सल्ला, ज्याचा खरा अर्थ अनेक वर्षांनंतर उमगला. या क्षणांनी मला बॅलन्स शीटमधील आकड्यांपेक्षा अधिक घडवले.

हे पुस्तक मी त्या प्रत्येक स्वप्नाळू व्यक्तीसाठी लिहिले आहे, जी कधीकाळी माझ्यासारखीच महत्त्वाकांक्षी होती, पण अनिश्चिततेशी झुंज देत होती; स्वतःहून कधीही न मागितलेल्या अपेक्षांचे ओझे वाहत होती आणि 'आपल्यात खरंच ते सामर्थ्य आहे का?' हा प्रश्न स्वतःलाच विचारत होती. या पुस्तकातून मी यशाचे कोणतेही ठरावीक सूत्र सांगितलेले नाही, कारण यशाला असे कोणतेही एकच सूत्र नसते. मात्र, माझ्या प्रवासातील सत्य अनुभव आणि आयुष्यभर जपलेली मूल्ये मी मनापासून मांडली आहेत. माझी ही कहाणी एखाद्या वाचकाला त्याचा पुढचा कठीण निर्णय अधिक धैर्याने आणि कमी भीतीने घेण्याची प्रेरणा देऊ शकली, तर या पुस्तकाचा हेतू सफल झाला, असे मी मानेन.

पेंग्विन रँडम हाऊस इंडियाचे लीड – पेंग्विन एंटरप्राइझ, कस्टम पब्लिशिंग, अनुज दत्ता म्हणाले, प्रकाशक म्हणून आम्ही नेहमी अशा कथा शोधत असतो, ज्या केवळ यशाची गाथा सांगत नाहीत, तर त्यामागचा खरा प्रवासही उलगडतात. 'चूजिंग गोल्ड'बाबत सर्वात विशेष वाटले ते म्हणजे त्यातील प्रामाणिकपणा. सौरभ यांनी केवळ त्यांच्या यशाविषयी लिहिलेले नाही, तर त्यांच्या आयुष्याला आकार देणारे कठीण निर्णय, अपयश आणि आत्मसंशयाचे क्षणही अत्यंत प्रामाणिकपणे मांडले आहेत. त्यामुळे हे पुस्तक केवळ व्यवसायाच्या यशाची कहाणी न राहता नेतृत्व, जिद्द आणि आत्मविश्वासाचा एक अतिशय वैयक्तिक आणि प्रेरणादायी प्रवास बनते. उद्योजक, व्यावसायिक नेते तसेच करिअरच्या कोणत्याही टप्प्यावर असलेल्या प्रत्येक वाचकाला या पुस्तकातील अनुभवांतून नक्कीच प्रेरणा आणि विचारांची नवी दिशा मिळेल. 'चूजिंग गोल्ड' हे डॉ. सौरभ गाडगीळ यांनी त्यांच्या आयुष्यातील निर्णय, अनुभव आणि शिकवणींचा प्रामाणिक लेखाजोखा म्हणून लिहिले आहे. हे पुस्तक केवळ दागिन्यांच्या व्यवसायाशी संबंधित वाचकांसाठी मर्यादित नसून, वारशाची जबाबदारी पेलणाऱ्या व्यक्ती, स्वतःच्या बळावर यशस्वी वाटचाल घडवणारे उद्योजक तसेच करिअरच्या प्रत्येक टप्प्यावर आत्मसंशयाशी सामना करणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरेल.




या पुस्तकाचा औपचारिक प्रकाशन सोहळा ६ ऑगस्ट रोजी मुंबई येथे खासगी समारंभात पार पडणार पडला, त्यावेळी डॉ. सौरभ गाडगीळ यांच्यासोबत अभिनेत्री माधुरी दीक्षित विशेष संवाद साधला. या संवादातून 'चूजिंग गोल्ड' या पुस्तकामागील प्रेरणादायी प्रवास, अनुभव आणि त्यातून मिळालेल्या शिकवणीवर प्रकाश टाकला गेला.

'चूजिंग गोल्ड' हे पुस्तक भारतातील सर्व 'पीएनजी ज्वेलर्स'च्या शोरूममध्ये तसेच pngjewellers.com वर उपलब्ध असून, Amazon वर प्री–ऑर्डरसाठी खुले आहे. ३१ ऑगस्ट २०२६ पासून हे पुस्तक देशभरातील प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे उपलब्ध होईल. तसेच, याची Kindle आवृत्ती देखील लवकरच वाचकांच्या भेटीला येणार आहे.

# कडूसमध्ये महिलेची निर्घृण हत्या; ग्रामस्थांचे ठिय्या आंदोलन

## अत्याचारानंतर दगडाने डोक्यात वार केल्याचा संशय | आरोपींना अटक होईपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याचा ग्रामस्थांचा निर्धार

**● पारनेर | वीरभूमी-**

पारनेर तालुक्यातील कडूस येथे गुरुवारी (दि. ६ ऑगस्ट) सकाळी घरातून फिरण्यासाठी गेलेल्या ४२ वर्षीय महिलेची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. महिलेवर अत्याचार करून डोक्यात दगडाने वार करण्यात आल्याचा संशय असून, या घटनेमुळे कडूस व परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी सुपा पोलिसांनी अज्ञात ४ ते ५ इसमांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेच्या निषेधार्थ कडूस ग्रामस्थ आक्रमक झाले असून, शुक्रवार (दि. ७) सकाळी ११ वाजता सुपा पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले. आरोपींना अटक केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. आंदोलनात महिलांची संख्या लक्षणीय होती.

मृत महिलेचे नाव उषा पांडुरंग शिंदे (वय अंदाजे ४२, रा. कडूस, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) असे आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उषा शिंदे या मानसिक आजाराने त्रस्त होत्या. त्यांना दररोज सकाळी साडेनऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास घराजवळील डोंगर परिसरात फिरायला जाण्याची सवय होती. गुरुवारीही त्या नेहमीप्रमाणे घरातून बाहेर पडल्या.

दुपारी साडेतीनच्या सुमारास गुरे चारत असलेले नामदेव करंजुळे यांना कडूस ते पाडळी रांजणगाव मार्गावरील लमाणबाबा टेकडीच्या पायथ्याजवळ, नामदेव भुजंगराव करंजुळे यांच्या गट क्रमांक २७२ मधील शेतात उषा शिंदे रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत दिसून आल्या. त्यांच्या डोक्यावर मोठ्या दगडाने वार केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. त्यांनी तातडीने सरपंच मनोज मुंगसे व पोलिसांना माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच सुपा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आल्यानंतर पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, नगर ग्रामीण विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी, डॉग स्कॉड, फिंगरप्रिंट तज्ज्ञ व फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी पाहणी केली. घटनास्थळावरून विविध पुरावे संकलित करण्यात आले.

पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी अहिल्यानगर येथे पाठविला आहे. या प्रकरणी अज्ञात ४ ते ५ इसमांविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील खुनाच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत. दरम्यान, दुपारपर्यंत ग्रामस्थ पोलीस ठाण्यासमोर ठिय्या देऊन होते.


■ छाया | भगवान गायकवाड

### आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी

■ सुपा पोलिसांनी सर्व आरोपींना अटक करून कडूस येथे आणावे. या घटनेचा तालुक्यातील तसेच कडूस गावातील महिलांच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करते. आरोपींना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे.

– **सुषमा रावडे,** महिला तालुकाध्यक्षा, पारनेर

### आरोपींना अटक होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार

■ दि. ६ ऑगस्ट रोजी घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असून माणुसकीला काळिमा फासणारी आहे. यामध्ये जे कोणी आरोपी असतील, त्यांना तात्काळ अटक करावी. तोपर्यंत आम्ही कडूस ग्रामस्थ पोलीस ठाण्यासमोरून उठणार नाही. सध्या शेतातील कामे सुरू असल्याने महिलांना शेतात ये-जा करावी लागते. या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. घटना घडल्यानंतर पोलिसांनी जशी तत्परता दाखवली, तशीच तत्परता आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यात दाखवावी.

– **मनोजकुमार मुंगसे**, भाजप युवा मोर्चा तालुकाध्यक्ष तथा सरपंच, कडूस

### घटनेच्या मुळाशी जाऊन तपास करावा

■ कडूसमध्ये घडलेली घटना अतिशय गंभीर असून तालुक्यातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलिस प्रशासनाने घटनेच्या मुळाशी जाऊन तपास करावा आणि हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवावे. आरोपींना अटक होईपर्यंत आम्ही मृतदेह ताब्यात घेणार नाही. पाडळी रांजणगाव व कडूस येथील चोरीच्या घटनांचा तपास वेळीच लागला असता तर अशा घटना घडल्या नसत्या. कडूस गाव मोठे असल्याने महिला शेतात, तर विद्यार्थीनी शाळेत जाण्यास घाबरत आहेत. आरोपींना अटक करून कठोरात कठोर शिक्षा द्यावी.

– **सुवर्णाताई धाडगे,** महिला तालुकाध्यक्षा, पारनेर
– **पूनमताई मुंगसे,** युवती तालुकाध्यक्षा, पारनेर

## रस्ते, सांस्कृतिक सभागृह, कब्रस्तान संरक्षण भिंत व सुशोभीकरणाच्या कामांना मिळणार वेग : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव | वीरभूमी-**

मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी तसेच ग्रामीण व नागरी भागातील नागरिकांच्या मूलभूत सुविधांमध्ये वाढ करण्याच्या उद्देशाने महायुती शासनाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी सुमारे १ कोटी ३० लाख रुपयांच्या कामांच्या निविदा प्रसिद्ध झाल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली.



मतदार संघातील रस्ते, सार्वजनिक सुविधा, सामाजिक व धार्मिक स्थळांचा विकास आणि सांस्कृतिक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देत शासनाकडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आमदार काळे सातत्याने प्रयत्नशील आहेत. या निधीमुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या विकासकामांना गती मिळणार असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अनेक अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे.

प्रसिद्ध झालेल्या निविदांमध्ये माहेगाव देशमुख येथील ६ चारी रस्ता ते भिकनभाई सय्यद वस्ती (ग्रामीण मार्ग क्र.२१) रस्ता मजबुतीकरण करण्यासाठी ४० लाख रुपये, कोळगाव थडी येथील ग्रामीण मार्ग क्र.२९ ते इब्राहिम शेख वस्ती रस्ता काँक्रीटीकरण करण्यासाठी ३५ लाख रुपये, वेस येथील मुस्लीम मोहल्ल्यात सांस्कृतिक सभागृह बांधण्यासाठी २० लाख रुपये, चितळी येथील कब्रस्तान संरक्षक भिंत बांधण्यासाठी २० लाख रुपये, तसेच रवंदे येथील कब्रस्तान सुशोभीकरण व सी.डी. वर्क करण्यासाठी १५.५० लाख रुपये मंजूर झाले असून या सर्व कामांच्या निविदा प्रसिद्ध झाल्या आहेत.

या विकासकामांच्या निविदा प्रसिद्ध झाल्यामुळे लवकरच प्रत्यक्ष कामांना प्रारंभ होणार आहे. रस्ते, सार्वजनिक सुविधा, सामाजिक व धार्मिक स्थळांचा विकास यामुळे नागरिकांच्या अडचणी कायमच्या दूर होणार असून संबंधित गावांतील नागरिकांना दर्जेदार रस्ते, सुरक्षित सार्वजनिक सुविधा आणि आवश्यक सामाजिक पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे चितळी, वेस, माहेगाव देशमुख, कोळगाव थडी, रवंदे आदी गावांमध्ये समाधानाचे वातावरण असून नागरिकांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

> कोपरगाव मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय आहे. कोपरगाव मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी व नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. विकासकामांसाठी निधी आणण्याची ही प्रक्रिया यापुढेही अधिक वेगाने निरंतर सुरु राहील.
>
> – **आ. आशुतोष काळे**

## पाथर्डी - अहिल्यानगर मार्गावर २० वाढीव एसटी फेऱ्या

### 'हात दाखवा, गाडी थांबवा' योजनेला प्रतिसाद | प्रवाशांचा प्रतीक्षाकाळ कमी होणार

**● पाथर्डी | वीरभूमी-**

पाथर्डी-अहिल्यानगर मार्गावर 'हात दाखवा, गाडी थांबवा' योजनेअंतर्गत २० वाढीव एसटी फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे रस्त्यावर बसची प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, पाथर्डी आगाराने या मार्गावरील सेवा प्रतिष्ठेची मानून नियोजन केले आहे. नवीन बसगाड्या उपलब्ध झाल्याने पाथर्डी आगाराच्या सेवेतही सुधारणा होत असल्याचे चित्र आहे.




विभाग नियंत्रकांनी परिवहन महामंडळाच्या धोरणानुसार नवीन बसगाड्यांचा स्थानिक पातळीवर अधिकाधिक वापर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार पाथर्डी आगारातून अहिल्यानगर तसेच शेवगाव-पैठण मार्गावर वाढीव फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

नगर मार्गावरील वाढीव फेऱ्यांची प्रवाशांची गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी आता पूर्ण झाली आहे. याबद्दल प्रवासी संघटनेने विभाग नियंत्रकांचे आभार मानले आहेत. अहिल्यानगर अथवा पाथर्डी बसस्थानकावर प्रवाशांना गाडीसाठी दहा मिनिटांपेक्षा अधिक वेळ प्रतीक्षा करावी लागू नये, असे नियोजन करण्यात आले आहे. मात्र दुपारच्या वेळेत दोन्ही बाजूंच्या फेऱ्यांमध्ये काही प्रमाणात वेळेचे अंतर ठेवण्यात आले आहे.

याशिवाय पुणे, मुंबई, कल्याण तसेच मराठवाड्यातील विविध भागांतून ये-जा करणाऱ्या गाड्यांची स्वतंत्र सेवा उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवासी संख्या वाढण्याची शक्यता आहे. वाढीव एसटी सेवेमुळे अवैध प्रवासी वाहतुकीलाही मोठ्या प्रमाणात आळा बसणार असून, प्रवाशांना सुरक्षित व जलद सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

पाथर्डी आगारातील बसगाड्या शक्यतो चहापाण्यासाठी अनावश्यक थांबवू नयेत, अशा सूचना स्थानिक अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. प्रवाशाने कोठेही हात दाखविल्यास त्याला बसमध्ये घेण्याचे धोरण असल्याने या मार्गावरील खासगी प्रवासी वाहतुकीतही घट झाल्याचे सांगण्यात आले.

याबाबत आगारप्रमुख अमित बनसोडे आणि वाहतूक निरीक्षक गोवर्धन दहिफळे यांनी सांगितले की, नगर मार्गासाठी नव्याने तयार केलेले वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. श्रावण महिन्यात धार्मिक स्थळांना जाण्यासाठी स्थानिक पातळीवरून ग्रुप बुकिंग झाल्यास प्रवाशांसाठी बस उपलब्ध करून दिली जाईल.

वरिष्ठांच्या परवानगीने लवकरच आदमापूर येथे बससेवा सुरू करण्याचा प्रयत्न आहे. तसेच पंढरपूर आणि माहूरगडसाठी वाढीव बसगाड्यांची मागणी विभाग नियंत्रकांच्या निदर्शनास आणून दिली जाणार आहे.

पूर्वीच्या तुलनेत चालक व वाहकांची संख्या कमी असल्याने दैनंदिन वेळापत्रक सांभाळताना आगारावर अतिरिक्त ताण येत आहे. त्यामुळे वाढीव कर्मचारी नियुक्त करण्याची मागणी विभाग नियंत्रकांकडे करण्यात आली आहे. विभाग नियंत्रकांकडून सकारात्मक प्रतिसाद आणि सर्वतोपरी सहकार्य मिळत असल्याने विविध फेऱ्यांच्या माध्यमातून उत्पन्नवाढीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्याचे चांगले परिणाम दिसून येत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# ठाकूर निमगावची गाववेस बनली धोकादायक

## जीर्ण कमानीमुळे दुर्घटनेची भीती | तातडीने संरचनात्मक तपासणी करण्याची मागणी

**● शेवगाव | वीरभूमी –**

तालुक्यातील ठाकूर निमगाव येथील मुख्य प्रवेशद्वारावरील जुनी गाववेस (कमान) अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत असल्याने संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ड. लक्ष्मण पांडुरंग मडके व साईनाथ पंढरीनाथ कातकडे यांनी केली आहे. याबाबत पंचायत समिती, शेवगाव येथे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून त्याची रीतसर पोहोचही घेण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, गाववेसीच्या वरच्या भागात पूर्वी ग्रामपंचायत कार्यालय कार्यरत होते. सध्या या इमारतीच्या भिंतींना मोठ्या प्रमाणात तडे गेले असून बांधकाम कमकुवत झाले आहे. गावातील मुख्य रहदारीचा रस्ता याच कमानीखालून जात असल्याने नागरिक, शालेय विद्यार्थी, दुचाकी-चारचाकी वाहने तसेच शेतीची वाहने मोठ्या प्रमाणावर ये-जा करतात. त्यामुळे कोणत्याही क्षणी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.

निवेदनासोबत जोडलेल्या छायाचित्रांमधून गाववेसीची दयनीय अवस्था स्पष्ट होत असल्याचे अर्जदारांनी नमूद केले आहे. पावसाळ्यात ही जीर्ण रचना कोसळल्यास जीवित व वित्तहानी होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

गटविकास अधिकाऱ्यांनी गाववेसीची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून सक्षम अभियंत्यामार्फत संरचनात्मक परीक्षण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दुरुस्ती शक्य असल्यास ती तातडीने करावी. अन्यथा जीर्ण गाववेसीचे निर्लेखन करून त्याच ठिकाणी सुरक्षित व मजबूत नवीन गाववेस उभारण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

तोपर्यंत संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक त्या सुरक्षेच्यादृष्टीने महत्वाच्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी विनंती करण्यात आली आहे.

### दुर्घटनेनंतर कारवाई करण्यापेक्षा ती होण्यापूर्वीच उपाययोजना आवश्यक

■ दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा ती होण्यापूर्वीच प्रशासनाने तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका ॲड. लक्ष्मण पांडुरंग मडके व साईनाथ पंढरीनाथ कातकडे यांनी मांडली आहे. आता पंचायत समिती व संबंधित विभाग या गंभीर प्रश्नावर किती तत्परतेने कार्यवाही करतात, याकडे ठाकूर निमगाव ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

